# धर्मप्रांतीय उपासना आयोग, वसई

## देवमाता मरियेचा सोहळा

## ०१ जानेवारी २०२१

## श्रद्धावंतांच्या प्रार्थना

**धर्मगुरू** ः माझ्या बंधू भगिनींनो, आमच्या तारणा-या परमेश्वराची दया आणि प्रेम आम्हामध्ये प्रकट झाले आहे. आपल्या स्वतःच्या सत्कृत्यांवर नव्हे तर अखिल मानवजातीवरील त्याच्या प्रेमावर विश्वास ठेऊन आपण आपल्या प्रार्थना परमेश्वराला अर्पण करू या.

**प्रतिसाद** ः **प्रभो, आमची प्रार्थना ऐक.**

१. अखिल ख्रिस्तसभेची त्यागाद्वारे सेवा करणारे आपले पोप फ्रान्सिस, आर्चबिशप फेलिक्स, धर्मगुरू व व्रतस्थ ह्यांना परमेश्वराची कृपा व चांगले आरोग्य मिळावे हणून आपण प्रार्थना करू या.

२. पवित्र मरियेचे जीवन आपल्या सर्वांसाठी आदर्श आहे. पवित्र मरियेच्या मध्यस्थीने आपणांस चागले जीवन जगण्यास कृपा मिळावी म्हणून आपण प्रार्थना करू या.

३. आपल्या देशात सर्वधर्म स्नेहभाव व बंधुत्वाची भावना वाढीस लागावी म्हणून आपण प्रार्थना करू या.

४. नवीन वर्षात देवाने आपणा सर्वांचे सर्व आपत्तीपासून रक्षण करावे व आपल्या कुटुंबावर परमेश्वराचा आशीर्वाद नित्य राहावा म्हणून आपण प्रार्थना करू या.

५. येणा-या नवीन वर्षात आपल्या धर्मग्रामात आणि धर्मप्रांतात होणा-या सर्व कार्यावर परमेश्वराचा आशीर्वाद असावा म्हणून आपण प्रार्थना करू या.

६. थोडा वेळ शांत राहून खालील हेतूंसाठी प्रार्थना करू या.

- आजारी व वयोवृध्द लोकांसाठी
- परदेशी व प्रवासात असलेल्यांसाठी
- सर्व लहान बालकांसाठी
- सर्व नवविवाहितांसाठी

**धर्मगुरू** ः हे प्रभो परमेश्वरा, प्रेमाने आणि आपले कौमार्य न गमावता मरियेने आमचा प्रभू आणि तुझा पुत्र येशू ख्रिस्त ह्याला जन्म दिला. तिला आमच्या प्रार्थना तुझ्यासमोर सादर करू दे. ही प्रार्थना आम्ही आमच्या प्रभूख्रिस्ताद्वारे करतो.